स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# दिव्यांगांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन योजना, दिव्यांग व्यक्तींकरिता सवलती व सुविधा इ.संबंधी घडी पत्रिका




## दिव्यांग कल्याण आयुक्तालय,

महाराष्ट्र राज्य,

३ चर्च पथ, पुणे ४११००१.

संपर्क : ०२०-२६१२६४७१

Email - commissioner.disabilitymaharashtra.gov.in


## दिव्यांगत्वाचे प्रकार

**(दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार)**

१. **शारिरीक दिव्यांगता(अस्थिव्यंग)** Locomotor Disabled

२. **कुष्ठरोग-मुक्त** (Leprosy Cured Persons)

३. **मेंदुचा पक्षाघात** (Celebral Palsy)

४. **शारिरीक वाढ खुंटणे** (Dwarfism)

५. **स्नायुंची विकृती** (Muscular Dystrophy)

६. **आम्ल हल्ला बाधित** (Acid Attack Victims)

७. **दृष्टीदोष** (Blindess),

८. **दृष्टीक्षीणता** (Low-vision),

९. **कर्णबधिरता** (Hearing Impairment / Deaf)

१०. **ऐकण्यास कठीण जाणे** (Hard of Hearing)

११. **वाचा व भाषा दोष** (Speech and language Disability)

१२. **बौध्दिक दिव्यांगता**

(Intellectual Disability / Earlier Known as Mentally Retireded)

१३. **अध्ययन अक्षमता** ( Specific Learning Disability)

१४. **स्वमग्नता** (Autism Sprctrum Disorder)

१५. **मानसिक आजार** (mental illness)

१६. **मज्जासंस्थेचे जुने आजार**

(Chronic Neurological Condision - **मल्टीपल स्क्लेरॉसिस,)**

१७. **मज्जासंस्थेचे जुने आजार**

(Chronic Neurological Condision - **पार्किनसन्स,)**

१८. **रक्त विकार संबंधित आजार**

(Blood Disorder - Haemophilia **हिमोफिलिया, )**

१९. **रक्त विकार संबंधित आजार**

(Blood Disorder -Thalassemia **थॅलेसेमिया, )**

२०. **रक्त विकार संबंधित आजार**

(Blood Disorder - Sickle Cell Disease {gH$b gob)

२१. **बहूविकलांगता** (Multiple Disability).

## दिव्यांगांची लोकसंख्या -

**२९,६३,३९२**

**(सन २०११ च्या जनजगणनेनुसार)**

## दिव्यांग व्यक्तींकरीता कायदे -

**(दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार)**

- ✻ शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये तक्रार निवारण अधिकाऱ्यांची नियुक्ती
- ✻ सर्वसमावेशक सुगम्यता निर्मितीचे शासनाचे उद्दीष्ट.
- ✻ दिव्यांगांसाठीच्या सर्व योजनांची परिणामकारक अंमलबजावणी.
- ✻ राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींना वैश्विक ओळखपत्र (UDID) वितरणाची अंमलबजावणी सुरु.
- ✻ शासकीय-निमशासकीय सरळसेवा व पदोन्तीमध्ये दिव्यांग व्यक्तींना चार टक्के आरक्षण.
- ✻ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकूण निधीच्या पाच टक्के निधी दिव्यांग व्यक्तींसाठीच्या योजनांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद.
- ✻ उच्च शिक्षणामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना पाच टक्के आरक्षण

## राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९.

✻ स्वमग्न, मेंदूचा पक्षाघात, बौध्दिक विकलांगता आणि बहुविकलांगता धारक दिव्यांग व्यक्तींच्या काळजी, सुश्रुषेकरीता व संपत्तीच्या संरक्षणाकरीता कायदेशीर पालक नियुक्त करण्याचे संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना अधिकार.

## भारतीय पुनर्वास परिषद अधिनियम १९९२.

✻ दिव्यांगांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन क्षेत्रात कार्य करण्याकरीता भारतीय पुनर्वास परीषदेकडे संबंधित तज्ञाची नोंदणी आवश्यक.

## राज्य शासन पुरस्कृत योजना

### (१) शासकीय संस्थांमधून दिव्यांगांचे शिक्षण व प्रशिक्षण-

शासकीय संस्थांमध्ये ६ ते १८ वयोगटातील अंध, कर्णबधिर व अस्थिव्यंग दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पध्दतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करुन मोफत शिक्षणाची सुविधा, निवास व भोजनाची विना मुल्य व्यवस्था करण्यात येते. तसेच १८ वर्षावरील दिव्यांग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने त्यांचे दिव्यांगत्व विचारात घेवून दिव्यांगत्वानुरुप विविध कुशल व अकुशल व्यवसायाचे प्रशिक्षण , त्यांच्या निवास व भोजनाची विनामुल्य व्यवस्था करण्यात येते.

### (२) स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या संस्थांमधून दिव्यांगांचे शिक्षण प्रशिक्षण

स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांगांच्या विशेष शाळेमधून वय वर्षे ६ ते १८ वयोगटातील अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग व मतिमंद दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पध्दतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करुन मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. त्याच बरोबर निवास व भोजनाची विना मुल्य व्यवस्था करण्यात येते. त्याच बरोबर १८ वर्षावरील दिव्यांग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने त्यांचे दिव्यांगत्व विचारात घेवून दिव्यांगत्वानुरुप विविध व्यवसायाचे दिव्यांग कर्मशाळांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे त्यांच्या निवास व भोजनाची विना मुल्य व्यवस्था करण्यात येते.

### (३) शालांत परिक्षा पुर्व शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती -

दिव्यांग शाळेतील अनिवासी विद्यार्थी तसेच सामान्य शाळेतील इयत्ता १ ली ते १० पर्यंत दिव्यांग विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट न लावता शालेय शिक्षणासाठी शालांत पुर्व शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या योजनेखाली दिली जाते.

**(४) शालांत परिक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती -**

अंध, अधूदृष्टी, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद व मनोरूग्ण विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी नंतरचे महाविद्यालयीन व्यावसायिक, तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या दर्जाप्रमाणे अभ्यासक्रमाचे गट करून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येते. त्याचबरोबर अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता तसेच सर्व अंपग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबरोबर शैक्षणिक शुल्क, प्रकल्प टंकलेखन खर्च, अभ्यासदौरा खर्चाची रक्कम दिली जाते.

**(५) दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल -**

१८ ते ५० वयोगटातील दृष्टीहीन कर्णबधिर व अस्थिविकलांग दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी रूपये १५००००/- व्यवसायाकरीता ८० टक्के बँकेमार्फत कर्ज व २० टक्के कमाल रूपये ३००००/- सामाजिक न्याय विभागामार्फत अनुदान देण्यात येते.

**(६) दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धा -**

दिव्यांगांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून प्रतिवर्षी राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

**(७) दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके -**

प्रत्येक विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामधून, इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण होणाऱ्या प्रथम तीन क्रमाकांच्या प्रत्येकी तीन दिव्यांग विद्यार्थ्यांना रूपये १०००/- रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

**(८) दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे -**

शारिरीक पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिविकलांग अपंगांकरीता कॅलिपर, कृत्रिम अवयव,तीन चाकी सायकल, कर्णबधिराकरीता श्रवणयंत्र, अंध विद्यार्थ्यांकरीता टेपरेकॉर्डर व कॅसेट्स इत्यादी साधनांसाठी रूपये ३०००/- पर्यंतचे अर्थसहाय्य देण्यात येते.

**(९) दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी अर्थसहाय्य -**

शासकीय तसेच शासन मान्य संस्थेमधून प्रशिक्षण पुर्ण केलेल्या १८ ते ५० वयोगटातील दिव्यांग व्यक्तींस प्रशिक्षण पुर्ण केलेला व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या साधनांकरीता रूपये १०००/- अर्थसहाय्य देण्यात येते.

**(१०) दिव्यांग कल्याण राज्य पुरस्कार -**

उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या दिव्यांग कर्मचारी / स्वयंउद्योजक, दिव्यांगांचे नियुक्तक यांना राज्य पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येते.

**(११) जागतिक दिव्यांग दिन -**

दिव्यांगत्वाविषयी जनजागृती निर्माण व्हावी व त्यांच्या समस्यांचे निराकरण होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमाचे आयोजन करून दिव्यांग दिन साजरा केला जातो. यामधून जनजागृतीसाठी दिव्यांग विषयक कायदे व दिव्यांग योजनांविषयक जनजागृती करण्यात येते.

**(१२) दिव्यांग मार्गदर्शन व सल्ला केंद्र -**

दिव्यांग व्यक्तींना विविध सोई सुविधांची माहिती व मार्गदर्शन करणे तसेच त्यांना या सुविधा मिळवून देण्यासाठी समाज कल्याण अधिकारी कार्यालयात दिव्यांग मार्गदर्शन व सल्ला केंद्र कार्यरत आहे.

**(१३) मतिमंद बालगृहे :-**

बालहक्क (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० व सुधारीत नियम २००६ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.

**(१४) दिव्यांग अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना**

किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग वधू किंवा वराने दिव्यांगत्व नसलेल्या वधू किवा वराशी विवाह केल्यास अथवा दिव्यांग नसलेल्या वधू किंवा वराने दिव्यांग असलेल्या वधू किवा वराशी विवाह केल्यास रु ५०,०००/- अर्थसहाय्य देण्याची तरतूद आहे.

**(१५) दिव्यांग व्यक्तींकरिता असलेल्या सवलती / सुविधा / लाभ**

१. रेल्वे/एसटी महामंडळाकडून दिव्यांग व्यक्तीस प्रवास करताना दुर प्रवास भाड्यामध्ये दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार देय असल्यास त्याच्या मदतनीसास सुद्धा सवलत.

२. जिल्हा सामान्य रुग्णालय व शासकीस वैद्यकीय महाविद्यालयाकडून दिव्यांग व्यक्तींना युडीआयडी या संगणकीय प्रणालीतून दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मोफत.

३. दिव्यांग कर्मचारी / अधिकारी यांना विशेष वाहन भत्ता.

४. बौध्दिक अक्षम प्रवर्गातील दिव्यांगांच्या पालकांना / दिव्यांग व्यक्तींना आयकरामध्ये सवलत.

५. दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करामध्ये सुट.

६. दिव्यांग व्यक्तींना शासकीय / निम शासकीय / महामंडळे यांच्या नोकर भरतीमध्ये ४ टक्के इतके आरक्षण.

७. दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालय, वसतीगृह व तत्सम उपक्रम यामधील प्रवेशामध्ये ५ टक्के इतके आरक्षण.

## दिव्यांग कल्याण आयुक्तालयाची सामाजिक प्रसिध्दी माध्यमे :

Mahasharad Portal
https://mahasharad.in/

disabilitycomm

disbailityMaharashtra

Commissionarate for Persons with Disabilities, Pune

सर्व योजनांसाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी तसेच मुंबई शहर / उपनगरसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचेकडे संपर्क साधावा.